**प्रेसनोट** **दिनांक १०/०७/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.**

**दुखापतीच्या गुन्हयातील पाहीजे असलेला तिसरा आरोपी पोलीसांच्या ताब्यांत.**

दिनांक-०७/०७/२०१९ रोजी रात्रौ २१-३० वाजताचे सुमारांस श्री. हर्षद नागनाथ जामगे, राहणार- अनिरुध्द् सहकारी सोसायटी, नारायण पेठ,पुणे, यांचेशी तात्कालीक झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरुन खुन, खुनाचा प्रयत्न यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हयातील पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार नामे निलेश दहीभाते याने त्याचे अन्य साथीदार ०२ साथीदारांसह श्री. हर्षद नागनाथ जामगे यांना स्टीलचे रॉडने व हाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी करुन दुकानाचे शटरला आग लावुन जाळणेचा प्रयत्न केलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-२५५/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ४३५, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता.

माननीय स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व माननीय श्री.सुधाकर चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना सदर गुन्हयातील वरनमुद आरोपी निलेश दहीभाते याचे साथीदारांपैकी अन्य एक साथीदार नामे मयुर सुरेश कसबे याचा सदर गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न करुन सदर पाहीजे असलेला आरोपी मयुर सुरेश कसबे हा ओंकारेश्वर पुल याठिकाणी आलेला असलेबाबत तपास पथकातील पोलीस शिपाई राहुल पवार व पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांना मिळालेल्या बातमी वरुन त्याआधारे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कलगुटकर व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री.विजय जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई राहुल पवार व पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांनी बातमीची खातरजमा करुन ओंकारेश्वर पुलाजवळ सापळा रचुन यांतील पाहीजे असलेला तिसरा आरोपी मयुर सुरेश कसबे, वय-२० वर्षे, राहणार-६३३, गंजपेठ,पुणे यांस ओकारेश्वर पुलाजवळुन दिनांक-१०/०७/२०१९ रोजी सापळा रचुन ताब्यांत घेवुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन व सदर गुन्हयातील सर्व निष्पन्न आरोपींना अटक करुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

(सुनिल कलगुटकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर